
दैनिक
# लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५ | अंक २६३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**

१६६६ : आग्र्याहून सुटका, शिवाजी महाराज राजगड येथे सुखरूप पोहोचले.






# भुजबळांना लवकरच खडी फोडायला जावं लागणार!

## मनोज जरांगें पाटलांचा छगन भुजबळां वर मोठा दावा

## हैदराबाद गॅझेटच्या नोंदींवर आधारित आहे आणि तो आव्हान देण्यास सक्षम नाही.

## सरकारने या जीआरचे रक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.




मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर मराठा आरक्षणाबाबतच्या विधानांवरून टीका केली आहे. भुजबळ यांनी मराठा या नावावर आक्षेप घेतला असल्याचे आणि जात प्रमाणपत्रांबाबतच्या त्यांच्या भूमिकेवर जरांगे पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. जरांगे पाटील यांनी हे स्पष्ट केले आहे की, मराठा समाजाला अन्य जातींशी जोडले जाऊ नये आणि त्यांना स्वतःचे आरक्षण मिळावे. त्यांनी बोगस आरक्षण घेणाऱ्यांनाही लक्ष्य केले आहे आणि त्यांच्या विरोधात तीव्र भूमिका घेतली आहे. जरांगे पाटील यांच्या या भूमिकेमुळे मराठा आरक्षणाचा वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.




मराठा समाजासाठी आरक्षणाबाबतचा शासन निर्णय (जीआर) सध्या वादाच्या केंद्रस्थानी आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी या जीआरवर आक्षेप घेतला असून, त्यांनी मराठा या शब्दाबाबत आणि जात प्रमाणपत्राबाबत आपत्ती दर्शवली. या संदर्भात मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले की, हा जीआर हैदराबादच्या गॅझेटच्या नोंदींवर आधारित आहे आणि त्याची वैधता अबाधित आहे. पाटील यांनी सरकारच्या जीआरचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले की, कोर्टात कोणताही आव्हान येऊ शकतो तरी सरकारने या जीआरचे रक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. ओबीसी समाजाच्या काळजींवर प्रतिक्रिया देताना त्यांनी राजकीय हेतूंनी चालवल्या जाणाऱ्या

2 सप्टेंबरला राज्य शासनाने जो शासन निर्णय काढला तो अवैध्य आहे, तसेच जी उपसमिती राज्य सरकारने स्थापन केली होती ती देखील अवैध्य आहे. शासन निर्णय रद्द करावा आणि सुनावणी होईपर्यंत कुठलीही अंमलबजावणी करू नये, याचिकेवर निकाल येईपर्यंत कोणंतही जात प्रमाणपत्र देण्यात येऊ नये, शासन निर्णय काढण्याचा उपसमितीला कोणताही अधिकार नाही. आरक्षणासंदर्भातील समिती बाबत सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश स्पष्ट असून, त्याचं देखील इथे उल्लंघन झालं आहे, हा शासन निर्णय कायद्याच्या कसोटी टिकणार नाही, असा दावा याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला आहे.



## 16 टक्के आणि 2 टक्केच्या आरक्षणावरही सुनावणी व्हावी .मनोज जरांगें

मनोज जारंगे पाटील यांनी मराठा समाजासाठी १६% आणि अतिरिक्त २% आरक्षणाबाबत तातडीच्या सुनावणीची मागणी केली आहे. त्यांच्या या वक्तव्यातून मराठा आरक्षणाच्या कायदेशीर आव्हानासंदर्भात असलेली चिंता स्पष्ट होते. पाटील यांनी स्पष्ट केले की, त्यांचा जीआर हैदराबाद गॅझेटच्या नोंदींवर आधारित आहे आणि तो आव्हान देण्यास सक्षम नाही. त्यांनी याबाबतच्या कागदपत्रांची तयारी पूर्ण केल्याचे सांगितले आहे. या प्रकरणात शिव अखिल भारतीय वीर शैव युवक संघटनेने उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याची माहितीही आहे. ओबीसी समाजाच्या आंदोलनांचा आणि त्याच्या संभाव्य परिणामांचाही पाटील यांनी उल्लेख केला आहे

## अवकाळी पाऊस थांबताच तालुक्यात खरीप पूर्व मशागतील वेग; तालुक्यात ४५ हजार हेकटरवर होणार पेरणी

किल्लेधारूर (प्रतिनिधी)खरीप पूर्व मशागतीच्या कामांना वेग आला आहे.मान्सून पूर्व पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी बैल जोडी, ट्रॅक्टरच्या सहाय्याने मशागतीचे कामे करण्यास सुरुवात केली आहे. नांगरून, मोगडणे, पाळी घालणे यांसारखी कामे ट्रॅक्टरच्या माध्यम ातून केली जात आहेत. यामुळे जम ीन पेरणीसाठी योग्य होते आणि पीक बहरण्यास मदत होते.यावर्षी तालुका सहित जिल्ह्यात मे महिन्यामध्ये अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणत हजेरी लावली. मान्सून पावसाच्या च्या आधीच ३० ते ४० मिमी तालुक्यातील मंडळात पावसाची नोंद झाली आहे. कधी नव्हे ते मे महिन्यातच तालुका परिसरातील बंधारे,छोटे मोठे तळे भरले आहेत,तर कूपनलिका ला देखील पाण्याची उपलब्धी झाली आहे.दरम्यान म ाघील पाच सहा दिवसात अवकाळी ने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांनी खरीप पूर्व मशागतील वेग दिला आहे शेती ची नागरने,मोगडणे पाळी घालणे,शेती स्वच्छ करून खरीप पेरणीसाठी तयार करून ठेवली जात आहे. तालुक्यात यावर्षी ४५ हजार हॅकटर वर खरीप पेरणी केली जाणार आहे.झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी लगबग करून खत बियाणे खरेदी करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**खरीप पेरणी क्षेत्र(हेक्टर मध्ये)**

| | | |
|---|---|---|
| कापूस | २० ते २१ | हजार |
| सोयाबीन | १७ ते १८ | हजार |
| तूर | ४ ते ५ | हजार |
| मूग | २ ते २.५ | हजार |
| बाजरी | ०.५ | |

**८० ते १०० मि.मी.पाऊस पडल्यानंतर च शेतकऱ्यांनी पेरणी करावी,तसेच खते बियाणे खरेदी करताना अधिकृत दुकान दाराकडून करावे व पक्की पावती घ्यावी.पेरणी करताना आगोदर बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी.**
जनार्धन भगत(तालुका कृषी अधिकारी)

# नगरपरिषदेसह सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून बीड शहराचे सौंदर्यीकरण

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची सीओंसोबत चर्चा; वृक्षलागवड, सुशोभीकरण, फाऊंटेन, पार्किंगच्या मुद्द्यांकडे वेधले लक्ष

बीड दि.११ : शहराचे सौंदर्यीकरणासाठी बीड नगरपरिषदेत मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या अध्यक्षतेखाली विविध सामाजिक संस्थांची गुरुवारी (दि.११) बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची उपस्थिती होती. शहरातील रस्त्यांचे डेव्हलपमेंट, वृक्षलागवड, स्वच्छता, सुशोभीकरण, सार्वजनिक सोयीसुविधा या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये प्रस्तावित नवीन रोड व डीपी रोडमध्ये वृक्षारोपणासाठी जागा सोडून अंडरग्राउंड ड्रिपद्वारे पाणीपुरवठ्याची सोय करणे, बंद असलेल्या जिल्हा परिषद कन्या शाळेच्या ठिकाणी भाजी मंडई व महिला बचत गटासाठी मॉल उभारणे, शहरातील ओपन स्पेसला तारकंपाउंड करून वृक्षलागवड करणे, नवीन फुलांचे गार्डन प्रस्तावित करणे, चौक सुशोभीकरणांतर्गत शहरातील प्रमुख चौकात फाउंटेन उभारणे, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्समधील आतील जागा पार्किंगसाठी उपलब्ध करणे, जालना रोड दुभाजकाचे सुशोभीकरण करणे, शहर व उपनगरातील ओपन स्पेसमध्ये घनदाट



जंगल प्रकल्प उभारणे हे निर्णय घेतले. बैठकीत कोटक महिंद्रा बँकेने सामाजिक जबाबदारी अंतर्गत १ घंटागाडी व १०० डस्टबीन देण्याचे पत्र नगरपरिषदेला सुपूर्द केले. याबाबत उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. ही छोटेखानी बैठक झाली असली तरी लवकरच व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी फडसे यांनी स्पष्ट केले. या बैठकीस आय.एम.ए. जिल्हाध्यक्ष डॉ. अनंत मुळे, रोटरी क्लब अध्यक्ष विकास उमापूरकर, शहराध्यक्ष राहुल बोरा, झाडांची भिसीच्या प्रतिनिधी डॉ. नाईकवाडे, तसेच बँक ऑफ महाराष्ट्र, एचडीएफसी बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, कॅनरा बँक, कोटक बँक, आयडीबीआय आदी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## सप्टेंबर महिन्यात भोपाळमधील 'या' अद्भुत हिल स्टेशन्सला द्या भेट, ठिकाणांच्या प्रेमात पडाल



आपल्या भारतात फिरण्याचे अनेक ठिकाणं आहे. ऐतिहासिक म्हणा किंवा निसर्गांच्या सानिध्यात शांततेत वेळ घालवण्यासाठी प्रत्येकजण या ठिकाणांना भेट देण्यासाठी जात असतात. तर यामध्ये हिल स्टेशन्स देखील जगभरातून लाखो पर्यटकांना आकर्षित करतात. बऱ्याचदा आपल्याला असे वाटते की हिल स्टेशन्स फक्त उत्तराखंड किंवा हिमाचलमध्ये आहेत, पण तुम्हाला माहिती आहे का की मध्य प्रदेशची राजधानी असलेल्या भोपाळ शहराच्या आसपास अनेक सुंदर हिल स्टेशन्स आणि पर्यटन स्थळे आहेत, जी स्वर्गापेक्षा कमी नाहीत. येथील हिरवळ, धबधबे, ऐतिहासिक किल्ले आणि धार्मिक स्थळे पर्यटकांना एक वेगळच अनुभव देतात. तर तुम्हीही या सप्टेंबर महिन्यात किंवा आठवड्याच्या शेवटी हिल्स स्टेशन्सला भेट देण्याचा विचार करत असाल तर या ठिकाणांना नक्की एक्सप्लोर करा. मध्य प्रदेशचे मिनी स्वित्झर्लंड म्हणजेच पंचमढी

भोपाळपासून सुमारे 206 किमी अंतरावर असलेल्या पंचमढीला 'सातपुड्याची राणी' म्हटले जाते. हे ठिकाण जोडप्यांसाठी, कुटुंबासाठी आणि मित्रांसाठी एक परिपूर्ण ठिकाण आहे. येथील बी फॉल्स, अप्सरा विहार आणि पांडव गुहा पर्यटकांना आकर्षित करतात. जवळच असलेल्या राष्ट्रीय उद्यानात तुम्हाला हिरवीगार निसर्ग, जंगले आणि वन्य प्राणी देखील पाहायला मिळतील.

पाताळकोट खोरे: रहस्यमय आणि हिरवळपाताळकोट हे ठिकाण भोपाळपासून 256 किमी अंतरावर असलेली एक दरी आहे, जी घनदाट जंगलांनी आणि उंच झाडांनी वेढलेली आहे. ट्रेकिंग आणि ॲडव्हेंचरची आवड असलेल्यांसाठी हे ठिकाण उत्तम आहे. येथे पोहोचल्यानंतर तुम्हाला असे वाटेल की तुम्ही निसर्गाच्या कुशीत पोहोचला आहात. जवळचे छिंदवाडा शहर देखील स्थानिक पदार्थांची चव चाखण्यासाठी आणि भेट देण्यासाठी एक उत्तम ठिकाण आहे.मांडू: इतिहास आणि प्रेमाचा संगम

भोपाळपासून 287 किमी अंतरावर असलेले मांडू हे जहाज महाल आणि प्राचीन वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणाचे सौंदर्य पाहून असे वाटते की तुम्ही एखाद्या युरोपियन शहरात आहात. दोन तलावांच्या मध्ये बांधलेला जहाज महाल एखाद्या बोटीसारखा दिसतो आणि ही त्याची सर्वात मोठी खासियत आहे. मांडू हे त्याच्या ऐतिहासिक वारशामुळे आणि सुंदर बागांमुळे पर्यटकांचे आवडते ठिकाण बनलेलं आहे.मायकेल हिल्स: नैसर्गिक संगम

285 किमी अंतरावर असलेल्या अमरकंटकजवळील मायकेल हिल्सवरून तुम्हाला घनदाट जंगल आणि नद्यांचे अद्भुत दृश्य पाहता येईल. येथून नर्मदा आणि वनगंगा नद्यांचा संगम दिसतो. अमरकंटक शहर धार्मिक दृष्टिकोनातून देखील खूप खास आहे आणि वीकेंड गेटवेसाठी एक उत्तम पर्याय आहे.

सांची स्तूप आणि भोजपूर मंदिर: इतिहास आणि अध्यात्माचा संगम नैसर्गिक सौंदर्याव्यतिरिक्त भोपाळमध्ये अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळे देखील आहेत. तिसऱ्या शतकात सम्राट अशोक यांनी बांधलेल्या सांची स्तूप बौद्ध धर्माच्या प्रमुख स्मारकांमध्ये गणला जातो. त्याच वेळी, भोपाळपासून 32 किमी अंतरावर असलेल्या भोजपूर मंदिरात अपूर्ण असलेली जगातील सर्वात मोठे शिवलिंग आहे.

# 17 सप्टेंबरला बीड-नगर रेल्वेचे स्वप्न प्रत्यक्षात साकारणार : जिल्हा प्रशासन व रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी

बीड, दि. 11 : बीड जिल्ह्यात बहुचर्चित असलेली रेल्वे प्रत्यक्षात 17 सप्टेंबर 2025 मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी रोजी सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी सुरू आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी ब्रिजेशकुमार सिंग, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व इतर अधिकारी यांनी आज बीड येथील रेल्वे स्टेशन परिसराची पाहणी केली. बीड-नगर रेल्वेला 17 सप्टेंबरला हिरवी झेंडी दाखविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे येणार आहेत. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जनता या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणी बैठक व्यवस्था कशी असायला पाहिजे, पार्किंग व्यवस्था कशी असावी, व्हीआयपी आणि इतर रस्ते याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.



कार्यक्रमाचे नियोजन आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत काँवत हे स्वत: प्रत्येक बाबींचा आढावा घेवून नियोजन करत आहेत.

यावेळी रेल्वे प्रशासनातर्फे उपमुख्य अभियंता डी.डी. लोळगे, उपमुख्य अभियंता (इलेक्ट्रीक) ज्ञानेंद्रसिंग, रेल्वे विभागाचे विभागीय अधिकारी जितेंद्र सिंग व वरिष्ठ समन्वयक विजयकुमार रॉय तसेच अधिकारी उपस्थित होते . ही प्राथमिक पाहणी असून बैठक व्यवस्था व इतर मार्ग याबाबत सविस्तर माहिती पुरविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यावेळी सांगितले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी आढावा बैठक

बीड, दि. 11 : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त 17 सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा जिल्ह्यात दौरा होणार असून या दौऱ्यात अनेक महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ, जिल्हा क्रीडा संकुल उभारणी कामाचे भूमिपूजन, तसेच जिल्हास्तरीय गुरु गौरव पुरस्कार वितरण समारंभ पार पडणार आहे. या सर्व कार्यक्रमांच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे



मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, उपविभागीय अधिकारी, संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकी दरम्यान जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी सर्व विभागांनी योग्य नियोजन करुन आपापली जबाबदारी वेळेत व काटेकोरपणे पार पाडावी असे निर्देश दिले. यावेळी कार्यक्रमांचे वेळापत्रक, स्वागत समारंभाची आखणी, सुरक्षा व्यवस्था, निमंत्रितांचे नियोजन, अभ्यागंतासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी विशेष सूचना केल्या.

****

# मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांनी धानोरा रोडनेच प्रवास करावा! - नगरसेवक बनसोडे, मोरे यांची ठाम मागणी

बीड (प्रतिनिधी) - बीड शहरातील धानोरा रोड हा अत्यंत महत्त्वाचा व व्यस्त मार्ग असून, सध्या तो पूर्णपणे जर्जर अवस्थेत आहे. या रस्त्याने दररोज हजारो नागरिकांना खड्ड्यांतून वाट काढावी लागत आहे. त्यामुळे, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या प्रस्तावित बीड दौऱ्यात त्यांनी धानोरा रोडनेच प्रवास करावा, अशी ठाम मागणी नगरसेवक रणजीत बनसोडे व भैय्यासाहेब मोरे यांनी केली आहे. या मागणीमागील हेतू केवळ राजकारण



नसून, जनतेच्या दु:खाची थेट जाणीव करून देण्याचा आहे. धानोरा रोडच्या दुरुस्तीबाबत प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून, काम मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. मात्र प्रत्यक्ष पाहणी केल्याशिवाय या समस्येचे गांभीर्य लक्षात येणार नाही. म्हणूनच, या रस्त्याने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी प्रवास केल्यास, यंत्रणेला जाग येईल आणि कामास तात्काळ गती मिळेल, असा विश्वास नगरसेवकांनी व्यक्त केला आहे. धानोरा रोडवरून प्रवास केल्याशिवाय या रस्त्याच्या वेदना समजणार नाहीत! - असे सांगत नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले असून, राज्यातील सर्वोच्च नेतृत्वाने याच मार्गाने प्रवास करावा, अशी विनंती केली आहे.बीड शहराचा विकास केवळ भाषणांत न राहता प्रत्यक्ष कृतीतून दिसावा, यासाठीच ही आग्रही मागणी आहे. धानोरा रोडवरील नागरिकांची दररोजची कोंडी, धूळ, खड्डे आणि अपघातांची भीती पाहता, हा रस्ता लवकरात लवकर सुस्थितीत येणे ही काळाची गरज बनली आहे असे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# बीड रेल्वे स्थानकास लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे - भाजपा सरचिटणीस गणेश लांडे

बीड(दि. ११/०८/२०२५) बीड रेल्वे स्थानकास लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे ही मागणी निवेदना द्वारे बीड जिल्हा भाजपाचे सरचिनीस व बऱ्हाणपूरचे उपसरपंच श्री. गणेश लांडे यांनी केली आहे. या मागणीचा शासकीय पातळीवर पाठपुरावा व्हावा या मागणीसह त्यांनी हे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांना दिले आहे. हे निवेदन ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजितदादा पवार व मंत्री महोदया पंकजाताई मुंडे यांना देणार आहे अशी माहिती श्री गणेश लांडे यांनी दिली आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना श्री. गणेश लांडे म्हणाले की अहिल्यानगर बीड परळी रेल्वे हे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांचे स्वप्न होते . आज त्यांचे स्वप्न साकार होत आहे. त्याचे सर्वस्वी योगदान लोकनेते स्व. मुंडे साहेबांचे आहे. मुंडे साहेबांच्या नंतर या रेल्वेमार्गासाठी पंकजाताई यांनी सातत्याने याचा पाठपुरावा करीत या रेल्वेम ार्गासाठी केंद्र व राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला. ही रेल्वे बीडची भाग्यदाईनी ठरणार आहे. याचे श्रेय स्व. मुंडे साहेब त्यांच्या नंतर हा प्रकल्प नेटाने पुढे नेण्याचे श्रेय पंकजाताई व प्रीतमताई यांनाच द्यावे लागेल.

मराठवाडा मुक्तिदिनाचे औचित्य साधून अहिल्यानार - बीड - परळी या रेल्वेम



ार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , पालकमंत्री अजितदादा पवार व पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. त्यावेळी बीड स्थानकास लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे यासाठी मुख्यमंत्री , पालकमंत्री व पंकजाताई यांना हे निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती गणेश लांडे यांनी दिली.

बीड स्थानकास लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे ही लोकभावना आहे . त्यामुळे ही मागणी मान्य होणार असल्याचा विश्वास गणेश लांडे यांनी व्यक्त केला असून , त्यास मान्यता नाही मिळाल्यास जनआंदोलन उभे करू अशा भावना गणेश लांडे यांनी प्रतिपादन केली आहे.

यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, सचिव शांतिनाथजी डोरले, प्रदेश उपाध्यक्ष अनिलजी चांदणे, राजू शहाणे, भाजपा नेते दादासाहेब ननावरे,अप्पासाहेब झोड़गे,सरपंच चंदू मि साळ इत्यादी सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकनेते मुंडे साहेबाचा बीड रेल्वे ड्रिम प्रोजेक्ट ना. पंकजाताई मुंडे यांच्या अथक प्रयत्नातून साकार

## मुख्यमंत्री १७ रोजी दाखवणार हिरवा झेंडा-जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख

बीड/ प्रतिनिधी: -लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा अहिल्यानगर ते बीड रेल्वे ड्रीम प्रोजेक्ट ना. पंकजाताई मुंडे व माजी खा. प्रितम ताई मुंडे यांच्या अथक प्रयत्नाने पूर्ण होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून अहिल्यानगर ते बीड रेल्वे १७ सप्टेंबरला प्रत्यक्षात धावणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दि.१७ रोजी हिरवा झेंडा दाखवुन शुभारंभ करणार आहेत, परळी पर्यंतचा ड्रीम प्रोजेक्ट ना. लवकरच पुर्ण होईल असे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगीतले.भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले

की, आष्टी, पाटोदा शिरूर, बीड या भागातील जनतेचे रेल्वेचे स्वप्न १७ सप्टेंबर रोजी प्रत्यक्षात साकार होणार आहे. गेल्या कित्येक वर्षापासून जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक अहिल्या नगर बीड परळी हा रेल्वेमार्ग कधी पूर्ण होतो याची चातकाप्रमाणे वाट पाहत होते, अखेर तो क्षण जवळ येऊन ठेपला आहे. सुरुवातीला अहिल्या नगर ते आष्टी हा पहिला टप्पा पुर्ण करुन आष्टीपर्यंत रेल्वे सुरू करण्यात आलेली आहे. आता पुढील काम पुर्ण झाल्याने बीड पर्यंत रेल्वे धावणार असुन परळी पर्यंतचे काम प्रगतीपथावर आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी अहिल्यानगर बीड परळी रेल्वेचे स्वप्न पाहिले होते व ते पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करत असताना काळाने त्यांचा घात केला पण लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण करण्याचा विडा त्यांच्या कन्या ना. पंकजाताई मुंडे व तत्कालीन खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांनी उचलून राज्य व केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्याने आता प्रत्यक्षात रेल्वे धावण्याची वेळ आली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परळी येथील सभेत रेल्वेसाठी केंद्र सरकार संपूर्ण - मदत करण्याचे आश्वासन दिले होते आणि दिलेल्या शब्दाप्रमाणे त्यांनी वेळच्या - वेळी निधी उपलब्ध करून दिला. लोकसभा सदस्य असताना डॉ. प्रितमताई मुंडे - यांनी वेळोवेळी लोकसभेत या विषयावर पाठपुरावा केला. लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांनी राज्यात ग्रामविकास मंत्री असताना - राज्य सरकारला या रेल्वेसाठी अर्धा वाटा देण्यास भाग पाडले. दोन्ही मुंडे भगिनींनी या रेल्वेसाठी अथक परिश्रम करुन बीडकरांचे व मुंडे साहेबांचे स्वप्न - साकार केले आहे. यांच्या प्रयत्नांची फलश्रुती आहे.

नगर बीड रेल्वेमुळे जिल्ह्याच्या विकासाला निश्चित चालना मिळणार - आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी अहिल्यानगर ते बीड रेल्वे गाडी सुरू - करण्यात येणार आहे त्यादृष्टीने रेल्वे प्रशासन आणि गतीने कामाला लागले - आहे. तसेच बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील भूसंपादनाच्या कामालाही - प्रशासकीय गती दिली आहे. आष्टी पाटोदा शिरूर बीड लवकरच रेल्वेच्या - नकाशावर येणार आहेत. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आहे त्या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## नारळ पाणी पिण्याआधी नक्की तपासून पाहा ही गोष्ट; ही चूक करू नका, अन्यथा घातक ठरू शकेल



नारळाच्या पाणी आरोग्यासाठी किती फायदेशी असते हे आपल्या सर्वांनाच माहित आहे. नारळाचं पाणी म्हणजे आजारी माणसांपासून ते डाएट करणाऱ्या व्यक्तींपर्यंत उपयुक्त असतं. नारळाच्या पाण्याला आपण 'एनर्जी ड्रिंक' म्हणतो. पण जर हे नारळ पाणी पिण्याआधी एका गोष्टींची काळजी घेतली नाही तर मात्र हे 'एनर्जी ड्रिंक' आरोग्यासाठी नक्कीच घातक ठरू शकतं. कसं ते जाणून घेऊयात. नारळ पाण्यात अनेक पोषक घटक असतात नारळाचे पाणी इलेक्ट्रोलाइट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध असते. ते शरीराला ऊर्जा देतेच पण उन्हाळ्यात हायड्रेशन राखण्याचा सर्वोत्तम मार्ग देखील आहे, म्हणून लोक ते थेट नारळापासून पिणे सर्वात सुरक्षित मानतात, परंतु खरा धोका तेव्हाच सुरू होतो जेव्हा ते योग्यरित्या साठवले जात नाही. बुरशी मुळे नारळाच्या पाण्याची विषबाधा होऊ शकते जर नारळ उबदार आणि दमट ठिकाणी ठेवला तर त्यात बॅक्टेरिया आणि बुरशी सहज वाढू शकते. हे बहुतेकदा त्याच्या कवचातील भेगांमधून किंवा चुकीच्या पद्धतीने साठवले गेल्यास नारळात प्रवेश करतात. नारळ बाहेरून पूर्णपणे स्वच्छ दिसेल, परंतु आत असलेले पाणी दूषित झालेले असू शकते. म्हणूनच अनेक वेळा लोक नारळ पाणी फोडून दिल्यावर ते चेक न करतात पितात आणि आजारी पडतात. दूषित नारळ पाणी पिण्याचे धोकादायक परिणाम श्वास घेण्यास त्रास दूषित नारळ पाण्याचा फुफ्फुसांवर वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत दाब येणे आणि पाणी साचणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. वेळेवर उपचार न मिळाल्यास ते प्राणघातक देखील ठरू शकते. पोटदुखी आणि उलट्या: अतिसार शिळे किंवा खराब झालेले नारळ पाणी पिल्याने बॅक्टेरिया शरीरात प्रवेश करतात. त्यामुळे काही तासांतच उलट्या, जुलाब आणि पोटदुखी यांसारखी अन्न विषबाधेची लक्षणे दिसू लागतात. मेंदू आणि नसांवर परिणाम सर्वात धोकादायक परिस्थिती तेव्हा उद्भवते जेव्हा बुरशीमुळे खराब झालेल्या पाण्यात 3-नायट्रोप्रोपियोनिक ॲसिड तयार होते ते मेंदूवर परिणाम करते. यामुळे चक्कर येणे, चिंताग्रस्त होणे, स्नायू पेटके येणे आणि झटके येणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. दूषित नारळ पाण्यामुळे एका 69 वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला होता एका संशोधनातून असे दिसून आले आहे की दूषित नारळ पाणी पिल्याने एका 69 वर्षीय डॅनिश व्यक्तीचा मृत्यू झाला. तपासात असे दिसून आले की पाण्यात 3-एनपीए नावाचा विषारी पदार्थ होता, जो नारळाच्या आत असलेल्या बुरशीपासून तयार झाला होता. या घटनेवरून असे दिसून येते की नारळ पाणी नक्कीच थेट पिणे सुरक्षित नसते नारळ पाणी पिण्यापूर्वी काय खबरदारी घ्यायची ? नारळ नेहमी थंड आणि कोरड्या जागी ठेवा. खरेदी करताना, शेलमध्ये कोणत्याही भेगा किंवा खराब भाग नाहीना हे तपासा. नारळ फोडल्यानंतर लगेच पाणी प्या. अन्यथा

# (नरेगा) मध्ये होत असलेल्या गैरव्यवहारांची चौकशी लावण्यात यावी अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड

बीड - बीड जिल्ह्यामध्ये आम आदमी पार्टीच्या निरीक्षणात आले आहे की, बीड जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (नरेगा) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमध्ये (उदा. विहीर, वृक्षारोपण, फळबाग, तलाव, गाय गोठा, कांदा चाळ, रस्ते, नाले, ब्लॉक इत्यादी) मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याच्या तक्रारी संबंधित नागरिकांकडून प्राप्त झाल्या आहेत. विशेषतः बीड तालुक्यातील वरवटी, चराटा, अंजनवती, लिंबागणेश तसेच वडवणी तालुक्यातील काही गावांमध्ये संबंधित कामांमध्ये लाभार्थ्यांना लाच न देता कोणतेही काम मिळत नाही अशी परिस्थिती आहे. शिवाय, अनेक लाभार्थ्यांना काम झाले असतानाही त्यांच्या पेमेंटमध्ये अनावश्यक विलंब केला जातो किंवा ते दिलेच जात नाही, असेही निदर्शनास आले आहे. सदर प्रकार अत्यंत गंभीर असून, यामुळे शासनाच्या विश्वासार्हतेवर व जनतेच्या



अपेक्षांवर परिणाम होत आहे. त्यामुळे आपण कृपया याप्रकरणी तातडीने चौकशी लावून दोषींवर कडक कारवाई करावी. जर या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले, तर आम आदमी पार्टी बीड जिल्ह्यातील पीडित नागरिकांना घेऊन आपल्या कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असे निवेदन मा. उपकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना आम आदमी पार्टीच्या वतीने देण्यात आले यावेळी माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष रफिक पठाण अल्पसंख्यांक संकेत विभाग प्रमुख शकील पठाण सय्यद सादेक शहराध्यक्ष कृष्णा जगताप तालुका अध्यक्ष मिलिंद पाळणे कैलास पालीवाल इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# तालुकास्तरीय मुलीची खोखो स्पर्धा साई इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल च्या प्रांगणात अगदी उत्साहात संपन्न

जालना प्रतिनिधी रामेश्वर तांगडे

कुंभार पिंपळगाव तालुका घनसावंगी जिल्हा जालना येथे साई इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल च्या माध्यमातून मुलीचे खो-खो तालुकास्तरीय स्पर्धा ठेवली होती त्यामध्ये तालुक्यातील सर्व इंग्लिश स्कूलने अगदी उत्साहाने सहभाग नोंदवला १४ वर्षाखालील २१ आणि १७ वर्षा खालील २० संघानी अधिकृत नोंदणी करून २८ शाळेच्या संघाने उपस्थिती नोंदवून उत्कृष्ट सहभाग नोंदवला साई इंटरनॅशनल शाळेचे अध्यक्ष श्री दत्ताभाऊ कंटुले यांच्या मार्गदर्शनात शाळेच्या सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांनी स्पर्धा यशस्वी होण्याकरता अति परिश्रम घेतले आदर्श पत्रकार तथा समाज कार्यकर्ते खेळाडू प्रेमी श्री रामेश्वर तांगडे यांनी स्पर्धा स्थळी भेट देऊन नाणेफेक करून स्पर्धेला सुरुवात केली तसेच स्पर्धेतील सर्व खेळाडूंना योग्य असे म ार्गदर्शन केले तसेच मासेगावचे समाजसेवक श्री



श्याम नाना आनंदे हेही उपस्थित होते घनसावंगी तालुक्यातील क्रीडा शिक्षकांनी पंच म्हणून योग्य कामगिरी बजावली. केंद्रप्रमुख श्री सुनील खोडदे यांनी खिचडी ची व्यवस्था करून स्पर्धा नियोजनस मदत केली पंचायत समितीच्या वतीने गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनात साधन व्यक्ती डीए चित्राल यांनी पंचाची भूमिका बजावली तालुका आयोजक भागवत कडुळे यांनी उपस्थित सर्व खेळाडू क्रीडा मार्गदर्शनाचे कौतुक करून पुढील विजेत्यांना शुभेच्छा दिल्यात स्पर्धा अगदी उत्सवा त आणि आनंदात संपन्न झाली

# ग्रामीण रस्त्यांचे सीमांकन , सेवा पंधरवडा व कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी प्रशासन सज्ज

. महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील पायवाट , पाणंद व शिवार रस्त्यांचे संरक्षण , सीमांकन व अतिक्रमण हटवण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे . महसूल व वन विभागाच्या दि. २९ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार गाव नकाशावर असलेले व नसलेले सर्व रस्ते क्रमांकित करून कायमस्वरूपी नोंदवले जाणार आहेत . यासाठी ग्राम , तालुका व जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून ग्रामस्तरीय समितीत ग्रामम हसूल अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी असतील .

दरम्यान, छत्रपती शिवाजी म हाराज महाराजस्व अभियानांतर्गत दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान ङ्ग सेवा पंधरवडा ङ्घ साजरा करण्यात येणार आहे . यात तीन टप्प्यांत विशेष उपक्रम राबवले जाणार असून पाणंद रस्ते विषयक मोहीम , सर्वांसाठी घरे आणि नावीन्यपूर्ण उपक्रम यांचा समावेश असेल .छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी समाजाच्या नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे . प्राथमिक चौकशी ग्रामस्तरीय समितीकडून करून घेतली जाईल व उपविभागीय अधिकारी नियमानुसार जात प्रमाणपत्र वितरित करतील .

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १० सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची बैठक घेऊन सेवा पंधरवड्याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश दिले . लोकप्रतिनिधींना याबाबत अवगत करावे असेही त्यांनी सांगितले . त्यानंतर ११ सप्टेंबर रोजी अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक व उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी , ग्रामम हसूल अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी



यांचे प्रशिक्षण घेतले .

या बैठकीत धार्मिक यांनी सेवा पंधरवडा दरम्यान रस्त्यांचे सर्वेक्षण करून ते खुले करण्याचे , तसेच १७ सप्टेंबर रोजी ग्रामसभांमध्ये शासन निर्णयाचे वाचन करून लोकांच्या समस्या सोडवण्याचे निर्देश दिले . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कुणबी जात प्रमाणपत्र वितरणाची कार्यपद्धती स्पष्ट केली . बैठकीचे नियोजन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले होते . यावेळी



गटविकास अधिकारी अशोक राठोड व तालुका कृषी अधिकारी अशोक साळी उपस्थित होते .

ग्रामीण रस्त्यांचे संरक्षण , सेवा पंधरवड्याची अंमलबजावणी आणि कुणबी समाजाला जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून ग्रामस्तरापासून जिल्हास्तरापर्यंत यंत्रणा कार्यरत आहे .

# इस्लामपूर-ईश्वरपूर येथे ईद-ए-मिल्लनुन्नबी निमित्त भव्य कव्वाली कार्यक्रम संपन्न

## आमदार सदाभाऊ खोत ची उपस्थिती कव्वाल असलम साबरी यांचा फुलाचा गुच्छ देऊन स्वागत

(चकलंबा प्रतिनिधी असलम सय्यद ) इस्लामपूर -ईश्वरपूर (ता. वाळवा ) येथे ईद-ए-मिल्लनुन्नबीच्या पैगंबर जयंती वपावन अवसरानिमित्त असलम साबरी व त्यांची टीम भव्य कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सर्फराज डाके, प्रशांत चिकुर्डेकर व स्वप्निल सूर्यवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.कार्यक्रमाला रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सागर खोत,



माजी नगराध्यक्ष जयवंतराव पाटील, मोहसीनभैया पटवेकर, लालासो पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच ग्राम स्थांनीही मोठ्या संख्येने कवाली चा आनंद घेतला व कार्यक्रमाला हजेरी लावली. कव्वाल असलम साबरी यांनी कवाली अशी पाटण केली की समस्त गावकऱ्यांचे मन जिंकले

या कव्वाली कार्यक्रमाने सामाजिक सलोखा व एकोप्याचा संदेश देऊन श्रोत्यांची मनं जिंकली.

# बंजारा समाज बांधवांना एस.टी. प्रवगातून आरक्षण देण्यात यावे-देवानंद राठोड

केज/प्रतिनिधी बंजारा समाज बांधवांना एस.टी. प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे या मागणीचे लेखी निवेदन राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्रजी फडणवीस मार्फत केज तहसीलदार यांना गोर सेनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली देवानंद राठोड यांच्यासह बंजारा समाज बांधवांनी दिले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, महाराष्ट्रातील बंजारा तत्सम जमातीला अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश केलेली सेंट्रल प्रोविन्स बेरार (एम पी) च्या शिफारसी समवेत हैदराबादचे गॅजेट लागू केल्याची अधिसूचना निर्गमित करून वसंतरावजी नाईक व तत्कालीन शासनाच्या आणि न्या. बापट व अन्य आयोगांचे या जमातीस संविधानाच्या अनुच्छेद ३४२(२) नुसार अनुसूचित जमातीच्या आरक्षण टक्केवारीत (विजा-अ) ची टक्केवारी स्वतंत्रपणे समावेश करणारी राज्य शासनाची स्पष्ट शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात यावी. बंजारा तत्सम जम ातीची मापक अपेक्षा बंजारा तत्सम जमातीच्या आरक्षण विषयक समस्या व तत्कालीन मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे व श्री उद्धवजी ठाकरे यांच्या कार्यकाळात बैठक आयोजित करून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला गेला मात्र अद्यापही त्या प्रलंबित आहेत. महाराष्ट्र राज्यातील बंजारा जमातीला इतर राज्यात मिळालेल्या संविधानिक सवलती प्राप्त झालेल्या नाहीत. परिणामी महाराष्ट्रातील बंजारा



जमाती ह्या विकासापासून कोसो दूर असून अजूनही विषन्न अवस्थेत जगत आहेत. ते राहत असलेल्या तांड्यात कोणत्याही पायाभूत सुविधा नसल्याने तांडेचे तांडे विकसित व शहरी भागाकडे स्थलांतरित होत आहेत. परिणामी महाराष्ट्रातील तांडे आज ऊस पडत आहेत.

ना गावात ना धड जंगलात अशी अवस्था असणारे बंजारा तत्सम जमती यांनी वर्षानुवर्ष भारतीय संस्कृतीचे जतन केलेले असून सिंधू संस्कृती, वैदिक काळ ते आज पर्यंत भारताच्या जडणघडणीत, विकासात व स्वतंत्र्याच्या चळवळीत यांचा मोलाचा वाटा आहे. हे आपण जाणताच, सर्वांच्या रोजगाराची, वाहतूक, व्यवसाय, दळणवळणाचे साधन असलेली लदणी व तांडा पद्धत ही सन १८५३ ची रेल्वे आणि ब्रिटिशांनी बंद केले.सन१९३१ च्या जनगण्यवेळी बंजारा तत्सम विमुक्त व भटक्या जमाती सीआरआयएम आयएनएएल टीआरआयबीइएस ॲक्ट १८७१ कायद्याने बाधित असल्याने त्यांची सर्वकष नोंद न झाल्याने पर्याप्त प्रतिनिधित्व त्यांना मिळाले नाही. पर्यायाने सरकारपर्यंत त्यांचा आवाज ८० वर्ष या भेदभावामुळे पोहोचू शकला नाही. वेगवेगळ्या नावांत, प्रवर्गात, धर्म आणि राज्यात विभागले गेले. स्वतंत्र्याच्या आनंदोत्सवाला ही मुकले, नंतर ३ वर्षांनी आरक्षणाच्या यादीत व ५ वर्षा नंतर सार्वजनिक निवडणुकीच्या जागा वाटपातही ते कायद्यामुळे वंचित राहिले.१९५२ नंतर विमुक्त होऊन ही या विमुक्तांना न्याय मिळालेला असला तरी त्यानंतर त्यात अनेक प्रगत जातींचा समावेश झालाच विशेष म्हणजे घुसकोरी ही प्रचंड झाल्याने आज रोजी आरक्षण नसल्यागत जमा असे लेखी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे व विविध मुद्द्याचा संदर्भ देत सदरचे निवेदन दिले आहे. सदर मागणीचे लेखी निवेदन हे केज तहसीलच्या नायब तहसीलदार श्रीमती आशा वाघ मॅडम यांनी स्वीकारले. या लेखी निवेदनावर देवानंद राठोड यांची स्वाक्षरी आहे.

यावेळी सदर मागणीचे निवेदन देताना देवानंद राठोड, विनोदराठोड,आंकुश राठोड, बालासाहेब राठोड,उत्तम राठोड,आबासाहेब पवार,सुंदर राठोड,आत्माराम राठोड,पोपट राठोड,राहुल राठोड,हरीभाऊ राठोड,सचिन राठोड,नागेश राठोड,सुनिल राठोड,लहु राठोड,नितीन राठोड,गोरख राठोड,सुंदर राठोड कृष्णा पवार,नवनाथ राठोड,आमोल पवार,विकास राठोड,मधुकर पवार,दत्तू राठोड,सुधाकर पवार,कीशोर राठोड,प्रकाश राठोड व समस्त गोर बंजारा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेपाळ आणि भारतात पुन्हा राजेशाही लागू व्हावी, शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांची मागणी

ज्योतीषपीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी वाराणसीत मोठे वक्तव्य केले आहे. त्यांनी नेपाळमध्ये लोकशाहीच्या जागी पुन्हा राजेशाही लागू करण्यची मागणी केली आहे. शंकराचार्य म्हणाले की नेपाळमध्ये जोपर्यंत राजेशाही होती तोपर्यंत कोणतीही गडबड नव्हती. चीनने प्रचंड यांनी उभे करुन नेपाळमध्ये लोकशाहीचा माहौल तयार केला, परंतू जनता आता असंतुष्ठ आहे आणि पुन्हा राजेशाहीची मागणी करत आहे.

शंकराचार्य म्हणाले की हिंदू समाजाची शासन व्यवस्था राजेशाही आहे. यामुळे जगात किमान एक जागा तरी अशी असावी जेथे वेदमंत्रांनी अभिषिक्त राजा राज्य करावा आणि संपूर्ण जगाला दाखवले जाऊ शकेल की आपल्या परंपरेने देखील कल्याण होऊ शकते. भारतातही राजेशाही लागू करण्याची मागणी

ज्योतीषपीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी यावेळी भारतातही लोकशाही ऐवजी राजेशाही लागू करण्याची गरज असल्याचे सांगितले. ते म्हणाले



की भारतात हिंदू बहुसंख्य असूनही दुसऱ्या दर्जाचा नागरिक बनला आहे. अल्पसंख्याकांसाठी 300 योजना सुरु आहे. आणि त्यांची प्रत्येक मागणी मान्य होत आहे.तर 100 कोटी सनातनींचे ऐकले जात नाही असेही शंकराचार्य यावेळी म्हणाले.

सनातन हिंदू एकता पदयात्रेचे समर्थन

बिहार निवडणूकीत उतरण्याची घोषणा करताना शंकराचार्य म्हणाले की गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा आणि गोहत्येला दंडनीय अपराध ठरवला जावे. यासाठी आपण प्रत्येक विधानसभा जागेवर अपक्ष उमेदवार उभे करणार आहोत. त्यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या सनातन हिंदू एकता पदयात्रेचे समर्थन केले आणि कथावाचकांवरील नियंत्रणासाठी शंकराचार्यांना अधिकार पुन्हा द्यावेत अशी मागणी केली.

नेपाळमध्ये सरकार स्थापणेच्या हालचाली


नेपाळमध्ये गेले काही दिवस अराजक माजले आहे. येथे सोशल मीडिया बंदीवरुन सुरु झालेल्या आंदोलनाने उग्र रुप धारणे केले असून निदर्शकांनी प्रचंड विध्वंस केला आहे. नेपाळमध्ये काही वर्षांपूर्वी राजेशाही होती. त्यानंतर तेथे आलटून पालटून विविध पक्षाची सरकार येत होती. आता नेपाळमध्ये अंतरिम सरकार स्थापण करण्याच्या हालचाली सुरु असून सुशीला कार्की यांचे नाव पुढे आले आहे.

# बाबुराव मुंडे पाटील पालक मेळावा, सुरेश घुटे, दत्तात्रय नन्वरे यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न

केज/ प्रतिनिधी :-बाबुराव मुंडे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देवगाव येथील सेवक सुरेश गुट्टे व दत्तात्रय नन्वरे यांचा सेवापुर्ती समारंभ सोहळा व पालक मेळावा संपन्न झाला. यावेळी या सेवापुर्ती सोहळा समारंभ अध्यक्ष विजयकांत भैय्या मुंडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून केजचे गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मण बेडसर, विड्याचे सरपंच श्री. सुरज पटाईत, देवगावचे उपसरपंच श्री. शरद मुंडे, माजी उपसरपंच विठ्ठल मुंडे, कृष्णा अर्बन बँकेचे उपाध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी, शिवरामपुरी पत्तसंस्थेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी सुनिता पवार, पी. एस. नागरगोजे, मुकादम राधाकिसन मुंडे, राजेंद्र देशमुख, विठ्ठल भोसले, उद्योजक राहूल छाजेड, राजेंद्र शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक संजय मुंडे, मुख्याध्यापक सदाशिव मुंडे, प्रा. सचिन हांगे यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.वर्षाच्या कालखंडात त्यांनी नौकरी करत असतांना नौकरी हाच धर्म आहे असे त्यांनी केलेल्या त्यांच्या सेवेच्या अनुभवावरुन दिसून येते



, कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बालासाहेब मुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. बंडु मुंडे सर यांनी केले या बाबुराव मुंडे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देवगाव येथील विद्यार्थी यांनी विविध प्रयोग केले या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन विजयकांत भैय्या मुंडे यांनी केले व केलेल्या प्रयोगातून सिद्ध काय होते ते जाणून घेतल्यानंतर विद्यार्थी यांचा सत्कार करुन त्यांना चालणा देण्यासाठी सहाम हिण्याला पालक मेळावा घेणार असल्याचे सांगितले




# गणपती दर्शनासाठी गेलेल्या मुलाचे गुजरातमध्ये अपहरण

तुम्ही गणपतीला दर्शनासाठी गेला आहात आणि अचानक तुमचे अपहरण झाले, तर काय होईल! असाच काहीसा प्रकार वांगणीमध्ये राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलासोबत घडला. १ सप्टेंबर रोजी गणपती दर्शनासाठी तो गुजरातमध्ये गेला होता. पण तिथेच तीन अज्ञातांनी त्याला पळवून नेले. यानंतर खंडणीसाठी त्याच्या आईला फोन आला. त्यानंतर ५ दिवसांचा थरार रंगला. याप्रकरणी बदलापूर ग्रामीण पोलिसांनी एका मोठ्या अपहरण प्रकरणाचा यशस्वीपणे छडा लावत वांगणीतील एका अल्पवयीन मुलाची गुजरातमधून सुटका करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींनाही अटक केली आहे.



बीड निरीक्षक अधिकारी पुरवठा विभाग प्रशांत सुपेकर सरांना वाढदिवस निमित्ताने शुभेच्छा देताना सामाजिक कार्यकर्ते इमरान शाह, महमद पठाण, आमिर बेग दिसत आहे.

# डॉ. अशोक थोरातांचे अखेर निलंबन रद्द

## राज्य कामगार विमा सोसायटीचे संचालकपदी डॉ. अशोक थोरात यांची प्रतिनियुक्ती

केज/प्रतिनिधी आरोग्य,सामाजिक, राजकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रामध्ये स्वतः चे अस्तित्व निर्माण करून जनसामान्यांमध्ये नाळ जोडणारे डॉ. अशोक थोरात यांना जिल्हा शल्यचिकित्सक असताना राज्य शासनाने निलंबित केले होते. डॉ. अशोक थोरात यांचे अखेर निलंबन शासनाने रद्द केले आहे. परंतु डॉ. अशोक थोरात यांना बीडलाच पुनर्नियुक्ती न देता त्यांची राज्य कामगार विमा सोसायटीच्या संचालक पदी प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे. आपले निलंबन रद्द व्हावे यासाठी डॉ.



अशोक थोरात यांनी न्यायालयीन लढाई सुरु केल्यानंतर शासनाने ही भूमिका घेतली आहे. बीडचे जिल्हाशल्य चिकित्सक म्हणून डॉ. अशोक थोरात यांची कारकीर्द चांगली राहिली होती. मात्र कोरोना काळातील काही गोष्टींचा ठपका ठेवत त्यांना निलंबित करण्यात आले होते. विशेष म्हणजे या प्रकरणात ११ अधिकाऱ्यांची नावे असताना केवळ डॉ. अशोक थोरात यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. शासनाच्या निलंबन आदेशाला डॉ. अशोक थोरात यांनी मॅट व मा.उच्च न्यायालयात आवाहन दिले होते. यावर उच्च न्यायालयाने मॅटला कालबद्ध सुनावणीच्या निर्देश दिले होते. या सर्व पार्श्वभूमीवर आता राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने डॉ. अशोक थोरात यांच्या निलंबनचे आदेश रद्द केले असून त्यांना प्रतिनियुक्तीवर राज्य कामगार विमा सोसायटीच्या संचालकपदी नियुक्ती दिली आहे.

अखेर डॉ. अशोक थोरात यांचे शासनाने निलंबन रद्द केल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे व अभिनंदनाचा होत आहे.

# जन्मभूमी महाराष्ट्रातून शेकडो वर्षानंतर आपल्या पूर्वजांची मातृभूमी राजस्थानशी वंजारी सेवा संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचा संवाद...

प्रतिनिधी | पाली जोधपूर रोडवरील जय हिंग्लज माता मंदिरात संत चेतनगिरी महाराजांसह संतांच्या चातुर्मासात यज्ञाचा पूर्णार्पण समारंभ नुकताच पार पडला. वंजारा समाजातील चारही मंडळांच्या उपस्थितीत, समाजातील हुशार विद्यार्थी, इयत्ता १०वी आणि १२वीतील अव्वल, क्रीडा प्रतिभा, सरकारी कर्मचारी, नव्याने बढती मिळालेले कर्मचारी आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय सेवा देणाऱ्या समाजातील रत्नांचा सन्मान करण्यात आला. समारंभात, महंत चेतनगिरी महाराज यांनी चारही मंडळांच्या वरिष्ठांच्या सहमतीने नवनिर्मित ट्रस्टच्या प्रमुख पदांसाठी नामांकने देखील केली. बंजारा समाजातील विद्यार्थी व गुणवंतांचा गौरव करताना पाहुणे म्हणून माजी आमदार तथा अध्यक्ष गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ (राज्यमंत्री दर्जा),राष्ट्रीय अध्यक्ष वंजारी सेवा संघ श्री गोविंद अण्णाजी केंद्रे वंजारी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष राहुल जाधवर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी सभापती जिल्हा परिषद सातारा श्री मानसिंगराव माळवे वंजारा बंजारा समाज इतिहास अभ्यासक श्री प्रफुल्लकुमार वंजारी, सुरत येथील सामाजिक कार्यकर्ते श्री बबनमामा खाडे, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष श्री सुधाकर मुंडे, महाराष्ट्र प्रदेश संघटक श्री विकास आघाव, सचिव व्यापारी असोसिएशन लातूर सचिव श्री योगीराज शिरसाट , जिल्हा उपाध्यक्ष लातूर श्री अमोल मुंडे, श्री माणिक शिरसाट सर यांच्यासह चातुर्मास पाळणाऱ्या सर्व साधू-संतांचा राजस्थानी पगडी, पुष्पहार, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या समारंभात जय हिंगलाज माता बंजारा समाज वसतिगृह विकास संस्थेचे संस्थापक सदस्य गोपराम महाराज, संत विशंबर गिरी महाराज, संत शांतीगिरी महाराज,



हरीश गिरी, हनुमान गिरी महाराज, हिम्मत नाथ मिश्रीलालजी बंजारा, माजी पोलिस अधीक्षक श्री शेठरामजी बंजारा, श्री श्रवनकुमार (सभापती, पं. स. पाली, बाबुलालजी जोधपूर, मदनजी भोलावत, श्यामजी जोधपूर,पुरंसिंग बंजारा (फौंजी) शोपूर, बाबुलालजी अकेली, गोविंदप्रसाद (नगरसेवक )पाली यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. मंचाचे संचालन चंदनसिंग राजपुरोहित, हुक्मा राम आर्य यांनी केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com